# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 01 November 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०१ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- आगामी २५ वर्षांत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राष्ट्रीय एकता अतिशय महत्त्वाची असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन–सरदार पटेल यांच्या शतकोत्तर सुवर्णजयंती वर्षाला प्रारंभ
- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार
- दीपोत्सवात आज लक्ष्मीपूजनाची लगबग, स्नेहमिलन कार्यक्रमांसह सांगितिक कार्यक्रमांची सर्वत्र रेलचेल

आणि

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला नॅकचं `ए–प्लस` मानांकन जाहीर

****

आगामी २५ वर्षांत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राष्ट्रीय एकता अतिशय महत्त्वाची असून, फुटीरतावादी शक्तीपासून सावध राहण्याचं आवाहन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने गुजरातमधल्या केवडिया इथं राष्ट्रीय एकता दिवसाच्या कार्यक्रमाला काल ते संबोधित करत होते. सरदार पटेल यांचं दीडशेवं जयंती वर्ष कालपासून सुरु झालं असून, पुढचे दोन वर्ष देश, हा जयंती उत्सव साजरा करेल, असं पंतप्रधानांनी सांगितलं. तत्पूर्वी त्यांनी एकतानगर इथं, पटेल यांच्या स्टॅच्यू ऑफ युनिटीला पुष्पांजली अर्पण करुन नागरिकांना एकतेची शपथ दिली.

दरम्यान, या एकता दिनाच्या कार्यक्रमात रायगड जिल्ह्याच्या प्रवेशद्वाराची प्रतिकृती साकारण्यात आली होती. रायगडाची भूमी सामाजिक न्याय, देशभक्ती आणि राष्ट्र प्रथम या संस्कारांची भूमी असल्याचं सांगून, या कार्यक्रमात रायगडाला मानाचं स्थान दिल्याबद्दल पंतप्रधानांनी आनंद व्यक्त केला. आपण एकता दिवस आणि दिवाळी दोन्ही एकत्र साजरे करत आहोत, यामुळे भारत जगाशी जोडला जात असल्याचं सांगून, पंतप्रधानांनी, देशवासियांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसंच त्यांनी कच्छ इथं सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.

नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी पटेल चौक इथं सरदार पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

**

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल त्यांना सर्वत्र अभिवादन करण्यात आलं. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसंच काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी नवी दिल्लीत इंदिरा गांधी यांच्या शक्तीस्थळ या समाधीस्थळावर अभिवादन केलं.

राज्यात तसंच मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरसह सर्वत्र इंदिरा गांधी आणि सरदार पटेल यांना अभिवादन करून राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली.

****

विधानसभा निवडणुकीत महायुतीत बंडखोरी करून उमेदवारी अर्ज भरलेल्या सर्वांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करून अर्ज परत घेण्यासाठी राजी करण्याचे प्रयत्न, महायुतीच्या तिन्ही पक्षांकडून सुरू आहेत. काँग्रेस नेते रवी राजा यांनी काल मुंबईत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला, तेव्हा भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली. रवी राजा यांची भाजपाचे मुंबई उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

****

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये १८ ते १९ वयोगटातले एकूण २२ लाख २२ हजार ७०४, तर वयाची शंभर वर्षे पूर्ण झालेले ४७ हजार ३९२ मतदार असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. राज्यात सेवा दलातले एकूण एक लाख १६ हजार १७० मतदार आहेत. या सर्व

मतदारांसाठी एक लाख १८६ मतदान केंद्र उभारण्यात येत असून, यापैकी शहरी भागात ४२ हजार ६०४ तर ग्रामीण भागात ५७ हजार ५८२ केंद्र असणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २७ हजार ९६४ दिव्यांग मतदार असून, ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले ४० हजार ५७७ मतदार आहेत. या मतदारांना फॉर्म १२ ड भरुन गृह मतदानाचा पर्याय निवडायाचा असतो, यापैकी ७१५ दिव्यांग तसंच तीन हजार ५३७ वयोवृद्ध मतदारांनी गृह मतदानाचा पर्याय दिला आहे. जिल्ह्यात दोन हजार ५०८ सर्व्हिस मतदार आहेत, त्यांना टपाली मतदानाची सुविधा दिली जाते.

****

नांदेड जिल्ह्यात यंदा लोकसभा पोटनिवडणूक तसंच विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. जिल्ह्यातल्या नऊ विधानसभा मतदार संघांमध्ये नांदेड दक्षिण, नांदेड उत्तर, लोहा, मुखेड, नायगाव, भोकर, हदगाव, किनवट आणि देगलूर या मतदारसंघाचा समावेश होतो. मात्र लोकसभा मतदार संघात यापैकी किनवट, हदगाव आणि लोहा हे तीन मतदार संघ वगळता, इतर सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. या सहा मतदार संघातल्या मतदारांना लोकसभा पोटनिवडणुकीसाठी आणि त्यासोबतच संबंधित विधानसभा निवडणुकीसाठी असं एकाच दिवशी दोन वेळा मतदान करावं लागणार आहे.

****

येत्या २० नोव्हेंबरला होत असलेल्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन महसूल आणि वनविभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांनी केलं आहे.

***Byte…***

****

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांना प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणावरून काल सकाळी पुण्यात एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पुढचे काही दिवस त्यांना वैद्यकीय निरीक्षणाखाली ठेवण्यात येणार असून, दरम्यानच्या काळात वंचित बहुजन आघाडीच्या निवडणूक प्रचाराची जबाबदारी आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर, निवडणूक समन्वय समिती आणि जाहीरनामा समिती यांच्याकडे राहील असं पक्ष सूत्रांकडून कळवण्यात आलं आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज नांदेड जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा ऐकता येईल.

****

दीपोत्सवात सर्वाधिक मानाचा लक्ष्मीपूजनाचा सण आज साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आज सायंकाळी अश्विन अमावस्येला घरोघरी पारंपरिक पद्धतीनं लक्ष्मीपूजन केलं जाईल. या लक्ष्मीपूजनासाठी कमळासह विविध प्रकारची फुलं, नैवेद्यासाठी नाना तऱ्हेची पक्वान्नं, पूजेसाठी फडे–केरसुण्या, लक्ष्मीला अर्पण करण्याची शुभचिन्हं आणि सौभाग्यालंकार, तसंच विविध पूजा साहित्याची दुकानं सजली आहेत. रोषणाईच्या विविध प्रकारच्या माळा आणि दिवे तसंच कृत्रीम फुलांची तोरणं खरेदी करण्याकडे नागरिकांचा ओघ दिसून येत आहे.

****

दिवाळीनिमित्त स्नेहमिलन कार्यक्रमांसह दिवाळी पहाट आणि दीपावली संध्या सारख्या सांगितिक कार्यक्रमांची सर्वत्र रेलचेल आहे. सर्वसामान्य रसिकांचा या कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचं दिसून येत आहे. छत्रपती संभाजीनगर इथं काल शास्त्रीनगर गृहनिर्माण संस्थेच्यावतीनं दिवाळी पहाट हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रसिद्ध गायिका आशा खाडीलकर आणि वेदश्री खाडीलकर ओक यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. आशा खाडीलकर यांना ऐकण्यासाठी रसिक श्रोत्यांनी मोठी गर्दी केली होती.

महात्मा गांधी मिशन आणि मराठवाडा आर्ट, कल्चर ॲण्ड फिल्म फाउंडेशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे कालही अभ्युदय दीपोत्सव कार्यक्रम घेण्यात आला.

नांदेड इथं काल बंदाघाटावर दिवाळी पहाट कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी अभिजित राऊत आणि महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे उपस्थित होते. लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन जिल्हाधिकारी राऊत यांनी केलं. सर्व उपस्थितांनी यावेळी मतदानाची शपथ घेतली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला राष्ट्रीय अधिस्वीकृती आणि अधिमान्यता परिषद–नॅकच्या वतीनं काल अपेक्षित गुणनिकष पूर्ण केल्याबद्दल `ए–प्लस` मानांकन जाहीर करण्यात आलं आहे. मराठवाड्यात बहुजन समाजासाठी शिक्षणाची दारे खुले करून देणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन विद्यापीठ पुढे जात असून, आगामी काळात देखील सर्वांना सोबत घेऊन विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा आणि नावलौकिक उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू अशी भावना, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी व्यक्त केली आहे.

****

लातूर शहर विधानसभा मतदारसंघ निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार यांनी काल जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक खर्च विषयक विविध पथकांचा आढावा घेतला. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, तसंच सभा, रॅली, बैठकांमध्ये वापरलेले साहित्याची बारकाईने नोंद घ्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

****